. जिल्हाधिकारी, कार्यालय रत्नागिरी

केंद्र शासन पुरस्कृत, "दिनदयाळ अंत्योदय यांजना- राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान" अंतर्गत कंत्राटी तत्वावर ठोक मानधनाच्या पदावरील 11 महिन्याच्या कालावधीच्या नियुक्ती साठी थेट मुलाखती (walk in interview) साठी जाहीरात.

क्रमांक/नपाप्र-5/दिअयोरानाउअ/समुदाय संघटक/2018 दिनांक:- 23/01/2018

भरावयाची पदे:-

1. **पद :- समुदाय संघटक:-02 पदे**
   रत्नागिरी जिल्हयामधील नगरपरिषद खेड आणि राजापूर, या दोन नगरपरिषदेमध्ये प्रत्येकी 01 पद अशी एकूण 02 पदे भरावयाची आहेत.

2. **समुदाय संघटक या पराकरिता शैक्षणिक व अन्य अर्हता:-**
   **अ) शैक्षणिक अर्हता:-**
   १) किमान 12 वी पास
   २) समाज विकास क्षेत्रामध्ये किमान 5 वर्षाचा अनुभव आवश्यक
   ३) दारिद्रय रेषेखालील कुटुबांतील उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.
   ४) संगणकामधील MS Office [Word, Excel, Power Point याचे ज्ञान आवश्यक.
   ५) वयोमर्यादा- 18 ते 45 वर्षे / सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत काम केलेल्या उमेदवारांसाठी 5 वर्षे शिथीलक्षम

3. उमेदवारांची **दिनांक-31/12/2017** रोजी ची शैक्षणिक अर्हता/अनुभव व वयोमर्यादा विचारात घेतली जाईल.

4. अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा व त्यांचे सक्षम अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र अर्जदाराकडे असणे आवश्यक आहे.

5. **मासिक ठोक 10,000/- प्रतिमाह मानधन**

6. वरील समुदाय संघटक या पदाची कर्तव्य व जबाबदाऱ्या व अन्य अटी/शर्ती, मा. राज्य अभियान सचालक तथा आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. रानाउअ 2014/पदे/प्र.क्र.142-2/का-16 दि.16-12-2014 मध्ये विहित केलेल्या असुन, सदर पत्र जिल्हाधिकारी कार्यालयाच्या www.ratnagiri.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलले असून या पत्राची प्रत जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी येथील नगरपालिका प्रशासन शाखेमध्ये देखील उपलब्ध होइल. सदर कर्तव्ये व जबाबदाऱ्या व अन्य अटी/शर्ती, नियुक्त करण्यात येणाऱ्या **समुदाय संघटक** यांना बंधनकारक राहतील. नगरपरिषदेमध्ये समुदाय संघटक यांना कामावर हजर होण्यापुर्वी विहीत नमुन्यातील रु.100/- चे मुद्रांक पेपरवर करारनामा देणे बंधनकारक राहील. त्याशिवाय त्यांना कामावर हजर करुन घेतले जाणार नाही.

7. इच्छूक उमेदवारांनी त्यांचे अर्ज, वरील जाहिरातीमध्ये नमुद केल्यानुसार, शैक्षणिक अर्हता मुळ प्रमाणपत्र/कामाच्या अनुभवाच्या मुळ प्रमाणपत्रासह तसेच उमेदवार दारिद्रय रेषेखालील कुटुंबांतील असल्यास त्याबाबतच्या मुळ प्रमाणपत्रासह **दिनांक: 23/01/2018 रोजी सकाळी 10.00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी, नवीन इमारत, दुसरा मजला येथील सभागृहात** उपस्थित रहावे. उमेदवारांच्या प्राप्त होणाऱ्या अर्जांची छाननी करुन, पात्र उमेदवारांच्या मुलाखती त्याच दिवशी **सकाळी 11.00** वाजलेपासून घेण्यात येतील

8. **टीप:-**
   1. **प्राप्त अर्जांची संख्या विचारात घेऊन लेखी परीक्षा घेण्याचा अधिकार जिल्हा प्रशासनाने राखुन ठेवला आहे. तसेच मुलखतीचा दिनांक व वेळ बदलण्याचा अधिकार प्रशासनाने राखून ठेवलेला आहे.**
   2. सकाळी 11.00 नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.
   3. उमेदवारांनी मुलाखतीवेळी मूळ कागदपत्रे सादर करावयाची आहेत.
   4. भरतीप्रकिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत निर्णय घेण्याचा अंतिम अधिकार जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे राहील.

**स्थळ:- रत्नागिरी**
**दिनांक:- 09/01/2018**

सही/-प्रदीप पी.
**जिल्हाधिकारी ,रत्नागिरी**

--------XXXXXX--------

क्र.रानाउअ २०१४/पदे/प्र. क्र. १४२-२/का-१६
नगरपरिषद प्रशासन संचालनालय
शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला
सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई-३०

दिनांक :- डिसेंबर २०१४

16 DEC 2014

प्रति,

१. जिल्हाधिकारी,
------------------- (मुंबई/नवी मुंबई वगळून)

२. मा. आयुक्त / मुख्याधिकारी
महानगरपालिका / नगरपरिषदा (सर्व)
जिल्हा -------------------

**विषय :- केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (National Urban Livelihoods Mission) व राज्य शासन पुरस्कृत राज्य नागरी उपजिविका अभियान (State Urban Livelihoods Mission) अंतर्गत कंत्राटी तत्वावर सहाय्यक प्रकल्प अधिकारी व समुदाय संघटकांच्या नियुक्ती करण्याबाबत.**

संदर्भ :- १. केंद्र शासनाचे राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाच्या मार्गदर्शक सुचना क्र.K-१४०११/१/२०१३-UPA, दिनांक २४.९.२०१३
२. शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.एनयुएल-२०१४/प्र.क्र.१०४/नवि-३३, दिनांक २८.८.२०१४
३. कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग यांचे पत्र क्र. एनयुएल २०१४/स.क्र. २३४/नवि-३३, दि. २९.११.२०१४

शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.एनयुएल-२०१४/प्र.क्र.१०४/नवि-३३, दिनांक २८.८.२०१४ अन्वये ५३ शहरात राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान तसेच राज्यातील उर्वरीत २०६ शहरांमध्ये राज्य शासन पुरस्कृत राज्य नागरी उपजिविका अभियानाची अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. या अनुषंगाने विविध कंत्राटी पदांच्या नेमणूकीबाबत खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

➢ **कंत्राटी तत्वावर सहाय्यक प्रकल्प अधिकारी आणि समुदाय संघटकांच्या पदांवर नियुक्ती**

शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.एनयुएल-२०१४/प्र.क्र.१०४/नवि-३३, दिनांक २८.८.२०१४ अन्वये यापुर्वी सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत कार्यरत असलेले प्रकल्प संचालक/प्रकल्प अधिकारी व समुह संघटक यांना शैक्षणिक पात्रता व गुणवत्ता पूर्ण करीत असल्यास त्यांना सहाय्यक प्रकल्पधिकारी आणि समुदाय संघटकांच्या पदांवर नव्याने नियुक्ती तसेच याव्यतिरीक्त अतिरिक्त पदांना मानधन तत्वावर सुरुवातीस २ वर्षे कंत्राटी पद्धतीने नियुक्ती देण्याबाबत जिल्हाधिका-यांनी कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानूसार काही जिल्ह्यांनी नियुक्त्या दिलेल्या आहेत व अभियानाची अंमलबजावणी सुरु केलेली आहे. तथापी अद्यापी काही जिल्ह्यांमध्ये सहाय्यक प्रकल्प अधिकारी आणि समुदाय संघटकांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या नाहीत असे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे राज्यामध्ये सदर अभियानाची प्रगती मंदावली आहे.

उपरोक्त शासन निर्णयानूसार करावयाच्या नव्याने नियुक्त्यासंदर्भात ज्या जिल्ह्यांनी नियुक्त्या दिलेल्या आहेत अशा आणि ज्या जिल्ह्यांनी अद्यापी नियुक्त्या दिलेल्या नाहीत अशा सर्व ठिकाणी नियुक्त्यांबाबत सुस्पष्टता व सुसुत्रता असावी या अनूषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत कार्यरत असलेले प्रकल्प संचालक/प्रकल्प अधिकारी व समुह संघटक यांना नियुक्त्या दिलेल्या आहेत त्यांच्या कंत्राटी पद्धतीने नियुक्त्या या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अथवा जिल्हाधिका-यांनी नियुक्ती आदेशाच्या दिनाकापासून जो नंतरचा दिनांक असेल त्या दिनांकापासून लागू कराव्यात.

२) ज्या जिल्ह्यांमध्ये सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत कार्यरत असलेले प्रकल्प संचालक/प्रकल्प अधिकारी व समुह संघटक यांच्या नियुक्त्या अद्यापी आदेश काढून दिलेल्या नाहीत तथापी हे कर्मचारी नविन योजनेची कामे करीत आहेत अशा पात्र कर्मचा-यांच्या नियुक्त्या ह्या शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू करून आदेश काढावेत.

३) शासन निर्णयामध्ये शैक्षणिक पात्रता व गुणवत्ता पूर्ण करीत असल्यास नियुक्त्या देण्याबाबत नमूद केलेले आहे त्यानूसार या पत्रामध्ये सहाय्यक प्रकल्प अधिकारी आणि समुदाय संघटक यांची शैक्षणिक पात्रता व गुणवत्ता नमूद केलेली आहे त्यानूसार नियुक्त्या देण्यात आलेले अथवा नव्याने नियुक्ती देण्यात येत असलेले कर्मचारी सदर पात्रता पूर्ण करीत आहेत याची पडताळणी करावी. जे कर्मचारी शैक्षणिक अर्हता व इतर गुणवत्ता/पात्रता धारण करीत नाहीत अशा कर्मचा-यांना कार्यमुक्त करावे.

४) ज्या कर्मचा-यांच्या नियुक्त्या यापुर्वीच केलेल्या आहेत अथवा करण्यात येत आहेत अशा संबंधित अधिकारी कर्मचा-यांनी माहे सप्टेंबर २०१४ ते माहे नोव्हेंबर २०१४ या तिमाहीमध्ये केलेल्या अभियानाच्या कामाचा आढावा घ्यावा. व त्यांचा त्रैमासिक कामाचा अहवाल सादर करावा.

५) कंत्राटी पद्धतीने नियुक्त्या करण्यासंदर्भात वेळोवेळी काढण्यात आलेले/येत असलेले शासनाचे तसेच संचालनालयाचे आदेश बंधनकारक राहतील या अटीचा नियुक्ती आदेशामध्ये समावेश करण्याची दक्षता जिल्हाधिका-यांनी घ्यावी.

## ➢ राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाअंतर्गत ५३ शहरांमध्ये उपलब्ध करण्यात आलेली सहाय्यक प्रकल्प अधिका-यांची पदे

उपरोक्त शासन निर्णयामध्ये राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाअंतर्गत समाविष्ट असलेल्या ५३ शहरांमध्ये प्रत्येकी एक अशी सहाय्यक प्रकल्प अधिका-यांची ५३ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. यापुर्वी सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत सदर ५३ शहरांमध्ये प्रकल्प अधिका-यांची एकुण ४५ पदे निर्माण करण्यात आलेली होती. शासन निर्णयान्वये सदर पदांचे रुपांतर राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानामध्ये सहाय्यक प्रकल्प अधिकारी या पदात करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे तसेच या ४५ पदांवर यापुर्वी कार्यरत असलेले प्रकल्प संचालक/प्रकल्प अधिकारी यांना शैक्षणिक पात्रता व गुणवत्ता पूर्ण करीत असल्यास कंत्राटी तत्वावर रु. ३०,०००/- मासिक मानधन तत्वावर सुरुवातीस २ वर्षे नियुक्ती देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तरी या ४५ पदांवर पुर्वीचे प्रकल्प अधिका-यांना ते शैक्षणिक पात्रता व गुणवत्ता पूर्ण करीत असल्यास नियुक्तीची प्रक्रीया करावी तसेच वरील ४५ पदे वगळता आणखी ८ पदांची (५३-४५) (या पत्रासोबत जोडलेल्या मान्य पदांनूसार) नियुक्तीची प्रक्रीया जिल्हाधिका-यांनी करावी.

➢ **राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाअंतर्गत ५३ शहरांमध्ये उपलब्ध करण्यात आलेली समुदाय संघटकांची पदे**

तसेच या ५३ शहरांमध्ये सहाय्यक प्रकल्प अधिका-यांच्या मदतीसाठी ३६७ समुदाय संघटकांची कंत्राटी तत्वावरील पदे ठोक रु. १०,०००/- मानधन तत्वावर सुरुवातीस २ वर्षे नियुक्ती देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. यापुर्वी सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत सदर ५३ शहरांमध्ये समुह संघटकांची एकुण २०१ पदे निर्माण केलेली आहेत. शासन निर्णयानूसार सदर पदांचे रुपांतर राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानामध्ये समुदाय संघटक या पदात करण्यास आणि या २०१ पदांवर यापुर्वी कार्यरत असलेले समुह संघटकांना कंत्राटी तत्वावर रु. १०,०००/- मासिक मानधन तत्वावर सुरुवातीस २ वर्षे नियुक्ती देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. या अनुषंगाने वरील २०१ पदांवर यापुर्वीचे समूह संघटक ते शैक्षणिक पात्रता व गुणवत्ता पूर्ण करीत असल्यास त्यांच्या नियुक्तीची प्रक्रीया करावी तसेच १६६ पदांवर (३६७-२०१) (या पत्रासोबत जोडलेल्या मान्य पदांनूसार) कंत्राटी तत्वावर नियुक्तीची प्रक्रीया जिल्हाधिका-यानी करावी.

➢ **राज्य नागरी उपजिविका अभियानाअंतर्गत २०६ शहरांमध्ये उपलब्ध करण्यात आलेली सहाय्यक प्रकल्प अधिका-यांची पदे**

राज्य नागरी उपजिविका अभियानाअंतर्गत समाविष्ट असलेल्या २०६ शहरांमध्ये प्रत्येकी एक अशी सहाय्यक प्रकल्प अधिका-यांची २०६ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत सदर २०६ शहरांमध्ये प्रकल्प अधिका-यांची एकुण १०० पदे निर्माण केलेली आहेत. शासन निर्णयानूसार सदर पदांचे रुपांतर राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानामध्ये सहाय्यक प्रकल्प अधिकारी या पदात करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच या १०० पदांवर यापुर्वी कार्यरत असलेले प्रकल्प संचालक/प्रकल्प अधिकारी यांना कंत्राटी तत्वावर रु. ३०,०००/- मासिक मानधन तत्वावर सुरुवातीस २ वर्षे नियुक्ती देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तरी वरील १०० पदांवर पुर्वीचे प्रकल्प अधिका-यांना ते शैक्षणिक पात्रता व गुणवत्ता पूर्ण करीत असल्यास नियुक्तीची प्रक्रीया करावी तसेच आणखी १०६ पदांवर (२०६-१००) (या पत्रासोबत जोडलेल्या मान्य पदांनूसार) कंत्राटी तत्वावर नियुक्तीची प्रक्रीया जिल्हाधिका-यानी करावी.

➢ **राज्य नागरी उपजिविका अभियानाअंतर्गत २०६ शहरांमध्ये उपलब्ध करण्यात आलेली समुदाय संघटकांची पदे**

सहाय्यक प्रकल्प अधिका-यांच्या सहाय्यांकरीता उपरोक्त २०६ शहरांमध्ये समुदाय संघटकांची एकुण २१५ पदे (रु. १०,०००/-प्रतिमाह मानधन) निर्माण करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत सदर २०६ शहरांमध्ये समुह संघटकांची एकुण १३५ पदे निर्माण केलेली आहेत. शासन निर्णयानूसार सदर पदांचे रुपांतर राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानामध्ये समुदाय संघटक या पदात करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे तसेच या १३५ पदांवर यापुर्वी कार्यरत असलेले समुह संघटकांना कंत्राटी तत्वावर रु. १०,०००/- मासिक मानधन तत्वावर सुरुवातीस २ वर्षे नियुक्ती देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तरी १३५ पदांवर यापुर्वीचे समूह संघटक ते शैक्षणिक पात्रता व गुणवत्ता पूर्ण करीत असल्यास त्यांच्या नियुक्तीची

प्रक्रीया करावी तसेच ८० पदे (२१५-१३५) (या पत्रासोबत जोडलेल्या मान्य पदांनूसार) कंत्राटी तत्वावेर नियुक्तीची प्रक्रीया जिल्हाधिका-यानी करावी.

जिल्हाधिका-यांना सूचना देण्यात येत आहे की, शासन निर्णयानूसार मंजुर करण्यात आलेल्या कंत्राटी पदांनूसार महानगरपालिका व नगरपरिषद/नगरपंचायतीकरीता सद्या मंजुर करण्यात आलेल्या सहायक प्रकल्प अधिकारी व समुदाय संघटक यांचा तक्ता या पत्रासोबत जोडला आहे त्यानूसार नियुक्त्या कराव्यात तसेच **सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत कार्यरत असलेल्या व प्रचलित पद्धतीने नियुक्त केलेल्या प्रकल्प अधिका-यांचे व समूह संघटकांचे मुल्यमापन करून ते खाली नमूद शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर गुणवत्ता पूर्ण करीत असल्यास त्यांना शासन निर्णयाच्या दिनांकापासून नियुक्ती देणेबाबत प्रक्रीया वरील निकषांनूसार करावी व उर्वरीत पदांवर (या पत्रासोबत दिलेल्या नागरी संस्थानिहाय मंजूर पदांनूसार) कंत्राटी पद्धतीने नव्याने नियुक्तीची प्रक्रीया शासन जिल्हाधिका-यांनी करावी.**

काही नागरी संस्थांमध्ये यापुर्वी SJSRY मध्ये नियुक्त असलेल्या कर्मचा-यांपेक्षा कमी पदे मंजूर झाली असल्यास जिल्ह्यामधील इतर नागरी संस्थांमध्ये समान रिक्त पदांवर शैक्षणिक पात्रता व गुणवत्ता पूर्ण करीत असल्यास त्यांना नियुक्ती देण्याची कार्यवाही करावी.

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत यापुर्वी कार्यरत असलेल्या प्रकल्प अधिकारी व समुह संघटकांच्या व इतर रिक्त पदांवर कंत्राटी तत्वावर नियुक्त्या जिल्हाधिका-यांनी खाली नमूद केलेल्या विहीत शैक्षणिक पात्रता व गुणवत्तेच्या आधारे करावयाच्या आहेत.

➢ **<u>महानगरपालिका/नगरपरिषदांमध्ये सहाय्यक प्रकल्प अधिकारी/समुदाय संघटक नियुक्त करण्याबाबत शैक्षणिक पात्रता, गुणवत्ता व इतर अटी व शर्ती</u>**

**१. <u>सहाय्यक प्रकल्प अधिकारी :</u>**

(१) शैक्षणिक अर्हता : समाजशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी (प्रथम श्रेणी) किंवा एम.एस.डब्लू व कोणत्याही सामाजिक संस्थेतील कामाचा किमान ५ वर्षे अनुभव आवश्यक तसेच प्राधान्याने दारिद्रय रेषेखालील कुटूंबातील उमेदवारास सर्वोच्च प्रधान्य देण्यात यावे. संगणकामधील MS Office (Word, Excel, Power Point) याचे ज्ञान आवश्यक.

(२) वयोमर्यादा : १८ ते ४५ वर्षे /सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत काम केलेल्या उमेदवारांसाठी ५ वर्षे शिथीलक्षम

(३) मासिक मानधन :- रु. ३०,०००/- प्रतिमाह

(४) कर्तव्ये व जबाबदारी :

- सहाय्यक प्रकल्प अधिकारी शहर प्रकल्प अधिका-याच्या नियंत्रणाखाली अभियानाचे काम पाहील.
- अभियाना अंतर्गत मासिक प्रगती अहवाल (Monthly Progress Report) (Online) राज्य अभियान संचालक व जिल्हा प्रशासन अधिकारी यांच्याकडे सादर करणे.

- महानगरपालिका व नगरपरिषदेस अभियान अंतर्गत दिलेल उदिष्ट १०० टक्के साध्य करणे.
- सर्व लार्भार्थींची माहिती अद्यावत ठेवणे.
- प्रत्येक वर्षाचे एप्रिल महिन्यात सर्व घटकनिहाय इच्छूक लार्भार्थींची यादी तयार करणे.जेणेकरून वर्षाची उद्दीष्ट पूर्तता साध्य होणे शक्य होईल.
- दैनंदिन कामाची नोंदवही ठेवणे. सदर नोंदवहीत दैनंदिन केलेल्या कामाची नोंद ठेवणे.
- प्रशिक्षण ार्थीना विहीत केल्याप्रमाणे प्रशिक्षण देणेत येत आहे व तेथे विहीत केलेल्या सुविधा उपलब्ध आहेत याची खात्री करणे व तशी नोंद नोंदवहीत ठेवणे.
- प्रत्येक महिन्यात कमीत कमी १५ बचत गटांचे पदाधिकारी समवेत बैठक घेउन त्याना योग्य मार्गदर्शन करणे.
- शहरातील सर्व बँकाना दरमहा भेट देण व सादर केलेल्या प्रकरणाची सद्यस्थितीची माहिती घेणे. कर्ज प्रकरणात काही त्रुटी असल्यास, सबंधीतांकडून त्यांची पूर्तता करून घेणे. केलेल्या कार्यवाहीची नोंदवहीत नोंद ठेवणे.
- दर शनिवारी समुह संघटक यांची बैठक घेउन त्यांनी केलेल्या कामाचा आढावा घेणे व त्यांना मार्गदर्शन करणे.
- समुह संघटकानी केलेल्या कामाचा साप्ताहिक अहवाल शहर प्रकल्प अधिकारी याना सादर करणे.
- मानधनासाठी देयक सादर करताना त्यासोबत नोंदवहींची छांयाकीत प्रत सादर करणे.
- वेळोवेळी राज्य अभियान संचालक यांनी दिलेल आदेश/निर्देश यांचे पालन करणे.
- सहाय्यक प्रकल्प अधिका-याचे कार्यक्षेत्र हे त्या महानगरपालिका/नगरपरिषदेच्या क्षेत्रापुरते मर्यादित असेल. तथापी लोकहित अथवा प्रशासकीय गरज इ. कारणामुळे त्यांच्या बदल्या संबधित महसूल विभगातील कोणत्याही महानगरपालिका/ नगरपरिषदेत करणे अनूज्ञेय असेल.
- सहाव्यक प्रकल्प अधिका-याला हमी पत्रातून मुक्त व्हावयाचे असल्यास त्याने ३० दिवसाची पूर्वसूचना नियुक्ती अधिकान्यास देणे आवश्यक राहील.
- तसेच इतर अटी व शर्ती केन्द्र शासनाच्या राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियानाच्या मार्गदर्शक सुचना तसेच शासन नगर विकास विभागाच्या दि. २८ ऑगस्ट २०१४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे असतील. तसेच परिस्थितीनूसार इतर आवश्यक अटी नमूद करण्याचा अधिकार राखून ठेवण्यात येत आहे.

(५) नियुक्तीचा कालावधी : **प्रथम दोन वर्षे.** तथापि संबंधित महानगरपालिकांनी/नगरपरिषदांनी **सहाय्यक प्रकल्प अधिकारी** यांनी प्रथम वर्षातील शेवटच्या महिन्यात खालील बाबींचा आढावा घेऊन काम असमाधानकारक असल्यास सदर पदावर कार्यरत असलेल्या व्यक्तीस पुढे काम सुरू ठेवण्याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात यावा. तसेच पुढील वर्षाच्या (म्हणजेच दोन वर्षानंतर) शेवटच्या महिन्यात खालील बाबींचा आढावा घेऊन काम असमाधानकारक असल्यास सदर पदावर कार्यरत असलेल्या व्यक्तीस पुढे काम सुरू ठेवण्याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा.

- शासनाने/राज्य अभियान संचालकांनी /जिल्हा प्रशासन अधिका-यांनी मागितलेली माहिती/मासिक प्रगती अहवाल विहीत वेळेमध्ये सादर केली आहे का ?
- केन्द्र व राज्य शासनाने विहीत केलेला MPR (Monthly Progress Report) विहित वेळेमध्ये सादर केला आहे का?
- त्यांचेवर निश्चित केलेल्या जबाबदा-या व कर्तव्ये योग्यरीत्या पार पाडल्या आहेत.का ?
- वर्षामध्ये/दोन वर्षामध्ये केलेल्या कामाचा व नोंदवहीचा आढावा घेणे.
- घटकनिहाय दिलेल्या उद्दीष्टांपेकी किमान ६० टक्के उद्दीष्ट पूर्ण केले असणे आवश्यक राहील. तसेच अभियानाअंतर्गत इतर बाबींच्या प्रगतीचा आढावा घेऊन निर्णय घेणे.

(६) अनुपस्थिती : सहाय्यक प्रकल्प अधिका-यांना कोणतीही रजा अनुज्ञेय नसल्याने दोन महिन्यातून १ अनुपस्थिती अशी प्रकारे १ वर्षासाठी जास्तीत जास्त ६ अनुपस्थिती मानधनासाठी ग्राह्य धरण्यात यावी.

(७) इतर अटी व शर्ती : सहाय्यक प्रकल्प अधिका-यांना शासकीय अधिकारी/कर्मचा-यांना देय असलेल्या कोणत्याही सेवा शर्ती/सोयी सुविधा उपलब्ध राहणार नाही. सदर नियुक्ती कंत्राटी तत्वावरील असल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत सदरहू, कंत्राटी तत्वावर नियुक्त व्यक्ती शासकीय सेवेमध्ये समावेश होण्याबाबत मागणी करु शकणार नाही. शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे अन्य कोणतेही लाभ सेवेत समावेशन, वेतनश्रेणी, रजा पेन्शन इत्यादी सदर सहाय्यक प्रकल्प अधिका-यांना अनुज्ञेय नसतील.

सहाय्यक प्रकल्प अधिका-यांना अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे लेखी हमीपत्र लिहून दिल्यानंतर सहाय्यक प्रकल्प अधिकारी म्हणून नियुक्ती देण्यात यावी.

**२. समुदाय संघटक :**

(१) शैक्षणिक अर्हता : किमान १२ वी पास. समाज विकास क्षेत्रामध्ये किमान ५ वर्षाचा अनूभव आवश्यक. विशेषत शहरी दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील उमेदवारास प्रधान्य देण्यात यावे. संगणकामधील MS Office (Word, Excel, Power Point) याचे ज्ञान आवश्यक.

(२) वयोमर्यादा : १८ ते ४५ वर्षे /सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत काम केलेल्या उमेदवारांसाठी ५ वर्षे शिथीलक्षम

(३) मासिक मानधन :- रु. १०,०००/- प्रतिमाह

(४) कर्तव्ये व जबाबदारी :

- समुदाय संघटक हे शहर प्रकल्प अधिकारी व सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांचे नियंत्रणाखाली अभियानाचे काम पाहतील.
- देनंदिन कामकाजाचा साप्ताहिक अहवाल सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांचेमार्फ़त शहर प्रकल्प अधिका-यामार्फ़त सादर करतील.
- आपल्या कार्यक्षेत्रामधील नागरी दारिद्रय रेषेखालील नागरीक सामाजिक अभिसरणामध्ये समाविष्ट होत आहेत याची खात्री करणे.
- स्वयं सहाय्य गट, वस्ती स्तर संघ, शहर स्तरावरील समुह स्थापित करणे.
- आपल्या कार्यक्षेत्रामध्ये अभियानाअंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे
- अपंगांच्या स्वयं सहाय्य गटांचे तसेच इतर स्वयं सहाय्य गटांचे बळकटीकरण करणे, तसेच त्यांना अभियाना अंतर्गत सेवा उपलब्ध करून देणे.
- स्वयं सहाय्य गट आणि बँकांची संलग्नता करणे.
- शासकीय संस्थांशी समन्वय साधणे.
- अभियाना अंतर्गत विविध सर्वेक्षणांना सहाय्य करणे.
- अभियानाअंतर्गत सामाजिक संपर्क, सामाजिक मालमत्तांची देखभाल दुरुस्ती यासारख्या विकासकामांकरीता सहाय्य करणे.
- अभियानाअंतर्गत अभिलेखे करणे.
- सामाजिक स्तरावरील बैठकंचे आयोजन करणे तसेच सदर बैठकांना उपस्थित राहणे.
- कालबद्ध अहवाल सादर करणे.
- तसेच शहर प्रकल्प अधिका-यांमार्फ़त देण्यात येणा-या नविन उद्दीष्टे तसेच कर्तव्यांचे पालन करणे.

- ➢ समुदाय संघटक कार्यक्षेत्र हे त्या महानगरपालिका/नगरपरिषदेच्या क्षेत्रापुरते मर्यादित असेल. तथापी लोकहित अथवा प्रशासकीय गरज इ. कारणामुळे त्यांच्या बदल्या संबधित महसूल विभगातील कोणत्याही महानगरपालिका/ नगरपरिषदेत करणे अनूज्ञेय असेल.
- ➢ राज्य अभियान संचालक/जिल्हा प्रशासन अधिकारी/शहर प्रकल्प अधिकारी/सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांनी दिलेल्या आदेशांचे पालन करणे.
- ➢ समुदाय संघटकास हमी पत्रातून मुक्त व्हावयाचे असल्यास त्याने ३० दिवसाची पूर्वसूचना नियुक्ती अधिकाऱ्यास देणे आवश्यक राहील.
- ➢ तसेच इतर अटी व शर्ती केन्द्र शासनाच्या राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियानाच्या मार्गदर्शक सुचना तसेच शासन नगर विकास विभागाच्या दि. २८ ऑगस्ट २०१४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे असतील.

(५) नियुक्तीचा कालावधी : **प्रथम दोन वर्षे**, तथापि संबंधित महानगरपालिकांनी/नगरपरिषदांनी समुदाय संघटकाच्या प्रथम वर्षातील शेवटच्या महिन्यात साप्ताहिक अहवालाच्या आधारे कामाचा आढावा घेऊन. काम असमाधानकारक असल्यास सदर पदावर कार्यरत असलेल्या व्यक्तीस पुढे काम सुरू ठेवण्याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात यावा. तसेच पुढील वर्षाच्या (म्हणजेच दोन वर्षानंतर) शेवटच्या महिन्यात वर नमूद कामाचा आढावा घेऊन काम असमाधानकारक असल्यास सदर पदावर कार्यरत असलेल्या व्यक्तीस पुढे काम सुरू ठेवण्याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा.

(६) अनुपस्थिती समुदाय संघटक कोणतीही रजा अनुज्ञेय नसल्याने दोन महिन्यातून १ अनुपस्थिती अशी प्रकारे १ वर्षासाठी जास्तीत जास्त ६ अनुपस्थिती मानधनासाठी ग्राह्य धरण्यात यावी.

(७) इतर अटी व शर्ती : समुदाय संघटकांना शासकीय अधिकारी/कर्मचा-यांना देय असलेल्या कोणत्याही सेवा शर्ती/सोयी सुविधा उपलब्ध राहणार नाही. सदर नियुक्ती कंत्राटी तत्वावरील असल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत सदरहू, कंत्राटी तत्वावर नियुक्त व्यक्ती शासकीय सेवेमध्ये समावेश होण्याबाबत मागणी करु शकणार नाही. शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे अन्य कोणतेही लाभ सेवेत समावेशन , वेतनश्रेणी, रजा पेन्शन इत्यादी अनूज्ञेय नसतील.समूह संघटकास अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे लेखी हमीपत्र लिहून दिल्यानंतर नियुक्ती देण्यात यावी.

तरी वरील सूचनांनूसार कंत्राटी तत्वावरील सहाय्यक प्रकल्प अधिकारी व समुदाय संघटक यांच्या नियुक्तीबाबत तसेच इतर नव्याने भरावयाच्या पदांबाबत (या पत्रासोबत जोडलेल्या नागरी संस्थानिहाय मंजूर यादीनूसार) नियुक्तीची प्रक्रीया कार्यवाही लवकरात लवकर करावी जेणेकरून अभियानाअंतर्गत दिलेल्या उद्दीष्टांची पूर्तता करता येईल.

➢ **कंत्राटी तत्वावर जिल्हा संनियंत्रण अधिकारी तसेच महानगरपालिका/नगरपरिषदांसाठी विशेष तांत्रिक तज्ञ (Technical Expert) यांची नियुक्ती**

उपरोक्त शासन निर्णयामध्ये जिल्हास्तरावर अभियानाच्या नियंत्रणासाठी कंत्राटी तत्वावर जिल्हा संनियंत्रण अधिकारी तसेच महानगरपालिका/नगरपरिषदांसाठी विशेष तांत्रिक तज्ञ (Technical Expert) ही पदे निर्माण करणे आली आहेत. सदर पदांवर कंत्राटी तत्वावर ठोक मानधनावर नियुक्ती करणेची कार्यवाही राज्य अभियान संचालनायलय स्तरावर करणेत येत आहे.

तसेच जिल्ह्यामधील नव्याने निर्माण झालेल्या नगरपरिषद अथवा नगरपंचायतींचा समावेश SULM मध्ये नसल्यास त्यांच्या समावेशाबाबत प्रस्ताव आवश्यक त्या तपशीलासह संचालनालयाकडे सादर करावा जेणेकरून सदर प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी सादर करता येईल.

(मीता राजीवलोचन)
राज्य अभियान संचालक
तथा आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रत -

१) मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, (नवि-२), मंत्रालय, मुंबई ३२.
यांना माहितीसाठी सविनय सादर

२) सह सचिव, नगर विकास विभाग, (नवि-३४), मंत्रालय, मुंबई ३२.